## नो युवर कस्टमर/ग्राहकाला जाणून घ्या धोरण (KNOW YOUR CUSTOMER POLICY)

प्रिय ग्राहक,

भारतीय रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) बँकांना 'नो युवर कस्टमर/ग्राहकाला जाणून घ्या (केवायसी)' संदर्भातील उपाययोजनांची आखणी केली जात आहे, त्यांची अंमलबजावणी होत आहे आणि ग्राहकाला त्याबद्दल माहिती दिली जात आहे, याबद्दल खात्री करुन घेण्याच्या सूचना दिल्या आहेत.

या मार्गदर्शक तत्त्वांबद्दल तुम्हाला माहिती करुन देण्यासाठी हे माहितीपत्र आहे.

बनावट आर्थिक व्यवहारांसाठी बँक/वित्तीय संस्थेचा (एफआय) वापर करण्यास प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने वित्तीय संस्थांनी 'नो युवर कस्टमर/ग्राहकाला जाणून घ्या'बाबत सूत्रबध्द धोरणाचे पालन करण्याची गरज आहे. या धोरणामध्ये ग्राहकाची ओळख व पार्श्वभूमी याबद्दल समाधान होण्याच्या दृष्टीने करावयाच्या विविध प्रक्रियांचा समावेश आहे. यांस ग्राहक ओळख प्रक्रिया (सीआयपी) म्हटले जाते.

### 'नो युवर कस्टमर/ग्राहकाला जाणून घ्या' प्रक्रिया

या प्रक्रियेमध्ये ग्राहकाची ओळख पटवून घेणे आणि विश्वासार्ह व स्वतंत्र दस्तऐवज, तपशील किंवा माहिती पाहून खातरजमा करणे याचा समावेश आहे. केवायसी प्रक्रिया खालील बाबींची खातरजमा करुन घेण्यासाठी वित्तीय संस्थांच्या वतीने केली जाते.

1. कोणतेही खाते निनावी किंवा बनावट किंवा बेनामी नावाने (किंवा नावांनी) उघडण्यात आलेले नाही.
2. यासंदर्भातील अस्तित्वातील कायदे व विनियमांच्या आवश्यकतांचे तत्परतेने पालन केले जात असल्याबद्दल सक्षम अधिकाऱ्यांचे समाधान होणे.
3. लाभार्थ मालकाची ओळख पटवण्यासाठी आणि त्याच्या/तिच्या/त्यांच्या ओळखीची लाभार्थ मालक कोण आहे/आहेत, याबाबत समाधान होईल अशा पध्दतीने खातरजमा करण्यासाठी वित्तीय संस्थेने (एफआय) यो य त्या उपाययोजना केल्या आहेत, हे सिध्द करणे.

### ग्राहक ओळख प्रक्रिया

या प्रक्रियेमध्ये ग्राहकाची ओळख पटवून घेणे आणि विश्वासार्ह व स्वतंत्र दस्तऐवज, तपशील किंवा माहिती पाहून खातरजमा करणे याचा समावेश आहे. उधारीवेळी अस्तित्वातील कायद्यांतर्गत आवश्यकतांनुसार ग्राहकाची ओळख पटवण्यासाठी व त्याची खातरजमा करुन घेण्यासाठी वित्तीय संस्था (एफआय) कागदपत्रे जमा करते. पुरेशी केवायसी प्रक्रिया केली असल्याचे सिध्द करण्यासाठी, खाली नमूद केलेल्या यादीतील कोणताही ओळखीचा पुरावा व निवासाचा पुरावा वित्तीय संस्थांनी जमा करणे गरजेचे आहे.

| दस्तावेज/कागदपत्रे | तपशील |
|---|---|
| ओळखीचा पुरावा (कोणताही एक) | पॅन कार्ड |
| | पासपोर्ट |
| | मतदार ओळखपत्र |
| | युआयडी कार्ड |
| | ड्रायव्हींग लायसेन्स/चालक परवाना |
| | मालकाच्या वतीने प्रदान करण्यात आलेले ओळखपत्र |
| निवासाचा पुरावा (कोणताही एक) | पासपोर्ट |
| | वीजेचे बिल/देयक |
| | टेलीफोन/दूरध्वनीचे बिल/देयक |
| | रेशन कार्ड |
| | भाडेपट्ट्याचे करारपत्र |